# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट १७२-२३** **दिनांक ३०/०५/२०२३**

## ॲमेझॉन कंपनीच्या मुद्देमालाची चोरी व ४०७ टेम्पोचा अपहार करुन फसवणुक करणाऱ्या आरोपीतास ०७ तासांत अटक
## पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २८/०५/२०२३ रोजी १७:३० वाजताचे सुमारास ग्लोबल आर्केड सी.एफ.सी., ७/ए, परमार इंडस्ट्रियल इस्टेट, वसई पुर्व येथील ॲमेझॉन या ऑनलाईन शॉपींग कंपनीच्या गोडावुन मधील एकुण ०२,४१,१९७/- रुपये किंमतीचा माल हा मेहता इस्टेट चकाला, मुंबई येथे घेवुन जाणेकरीता टेम्पो चालक नामे आनंद राकेश तिवारी, रा. मुळग्राम कबीरखुर, पो.मुंगरा बादशाहपुर, ता. मछलीसर, जि. जौनपुर, राज्य उत्तरप्रदेश यास विश्वासाने ताब्यात दिलेला असताना त्याने स्वत:च्या आर्थिक फायदयाकरीता फिर्यादी यांचा विश्वासघात करुन फसवणुक करण्याच्या उद्देश्याने टेम्पोसह पळुन गेलेबाबत फिर्यादी नामे सचिन देवराव सोनपितरे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पेल्हार पोलीस ठाणेत दिनांक २९/०५/२०२३ रोजी गुन्हा.रजि.नं. ५०८/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३७९, ४०६, ४२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हा उघडकीस आणणेबाबत वरिष्ठांनी केलेले मार्गदर्शन व सुचनेप्रमाणे पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळाच्या ठिकाणचे व आजुबाजुच्या परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेजचे परिक्षण करुन आरोपी नामे आनंद राकेश तिवारी याने सदरचा गुन्हा केल्याची माहिती प्राप्त केली. तदनंतर तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीचे आधारे अरोपीत नामे आनंद राकेश तिवारी यास वाकीपाडा, नायगांव पुर्व येथुन पळुन जाण्याच्या तयारी असताना सापळा कारवाई करुन दिनांक २९/०५/२०२३ रोजी ताब्यात घेण्यात आले व गुन्हयातील अपहार, चोरी, फसवणुक केलेला ०२,४१,१९७/- रुपये किंमतीच्या वस्तु व ०२,००,०००/- रु. किंमतीचा टाटा ४०७ टेम्पो असा एकुण ०४,४१,१९७/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन सदरचा गुन्हा ०७ तासांत उघड केला आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. वसंत लब्दे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. तुकाराम माने, पो.ना. तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पो.अम /संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर तसेच पो.हवा. नामदेव ढोणे, नेम. पो.उप.आ. कार्या.परिमंडळ ३, विरार यांनी केली आहे.

----ooo----